**L. A. BILL No. LV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९६५ चा महा. ४०.

२०२५ चा महा. अध्या. १.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-५ ऐवजी दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३४१ब-५ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

पंचायत सदस्यांनी नगर पंचायतीच्या अध्यक्षाला काढून टाकणे.

"**३४१ब-५**. (१) कलम ३४१ब-१ अन्वये निवडून आलेला नगर पंचायतीचा अध्यक्ष, जर एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांच्या बहुमताने, विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, तसा निर्णय केला असेल तर, अध्यक्ष असण्याचे समाप्त होईल

परंतु, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत, असा कोणताही ठराव मांडण्यात येणार नाही.

(२) अशा विशेष सभेच्या मागणीपत्रावर, एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांकडून सही करण्यात येईल आणि ते, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) खालील मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, नगर पंचायतीची विशेष सभा बोलावील:

परंतु, जेव्हा जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील तेव्हा, तो, त्याची सूचना अध्यक्षास देईल.

(४) पोट-कलम (१) खालील ठरावावर विचार करावयाच्या सभेच्या अध्यक्षस्थानी, जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी असेल, परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अन्य अधिकाऱ्यास, मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(५) नामनिर्देशित पंचायत सदस्यांना, अध्यक्षास काढून टाकण्याशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(६) जर पोट-कलम (३) खालील प्रयोजनासाठी बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये, अध्यक्षास काढून टाकण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला नसेल, किंवा यथास्थिति, तो फेटाळण्यात आला असेल तर, अध्यक्षास काढून टाकण्याची मागणी करणारा कोणताही नवीन ठराव, नगरपंचायतीसमोर मांडण्यात येणार नाही.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२५ चा महा. अध्या. १.

**३.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.)एचबी-६६२-२ (४४५-७-२०२५)

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ३४१ब-१ च्या तरतुदींनुसार, ज्या नगर पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२२ (२०२२ चा महा. ४१) याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी घेण्यात आली आहे अशा प्रत्येक नगर पंचायतीचा अध्यक्ष हा, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला अध्यक्ष आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ब-५ अन्वये नगर पंचायतीच्या अध्यक्षास काढून टाकण्याच्या प्रक्रियेमध्ये, एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांनी सही केलेले, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावयाचे, अध्यक्षाविरुद्धच्या गैरवर्तणुकीच्या आरोपांचा अंतर्भाव असणारे मागणीपत्र, जिल्हाधिकाऱ्याने करावयाची चौकशी, शासनास सादर करावयाचे अशा चौकशीचे निष्कर्ष, जिल्हाधिकाऱ्याचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर शासनाने घ्यावयाचा अंतिम निर्णय यांचा समावेश आहे.

निवडून आलेल्या पंचायत सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला अध्यक्ष हा, जर एकूण पंचायत सदस्य संख्येपैकी, दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या पंचायत सदस्यांच्या बहुमताने, विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, तसा निर्णय केला असेल तर, अध्यक्ष असण्याचे समाप्त होईल अशी तरतूद करणे इष्ट आहे असे वाटले. म्हणून, विशेष सभेमध्ये संमत केलेल्या ठरावाद्वारे, पंचायत सदस्यांनी अशा अध्यक्षास काढून टाकण्यासाठी आणि त्यासाठीच्या प्रक्रियेकरिता तरतूद करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ब-५ ऐवजी, नवीन कलम दाखल करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. १), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **एकनाथ शिंदे,**

दिनांक ११ जून, २०२५. उप मुख्यमंत्री (नगर विकास).

**सन २०२५ चे वि. स. विधेयक क्रमांक ५५ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे.)

(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०)

**१.** ते **३४१ अ.** ** ** **

**३४१ ब.** ** ** ** नगर पंचायतीची रचना व निवडणूका

**३४१ ब-१** ते **३४१ ब-४.** ** ** **

**३४१ ब-५.** (१) कलम ३४१ब-१ खाली निवडून आलेल्या अध्यक्षाला पदावरून दूर करण्याच्या मागणी पत्रावर, एकूण पंचायत सदस्य संखेच्या निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी स्वाक्षरी केलेली असेल आणि त्यामध्ये, अशा अध्यक्षावरील गैरवर्तनाच्या आरोपांचा अंतर्भाव असेल आणि ते मागणीपत्र जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल : पंचायत सदस्यांनी नगर पंचायतीच्या अध्यक्षास पदावरून दूर करणे.

परंतु, असे कोणतेही मागणीपत्र असा अध्यक्ष निवडून आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत पाठविण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खालील मागणीपत्र प्राप्त झाल्यावर, जिल्हाधिकारी, अशा आरोपांची चौकशी करील आणि ते मागणीपत्र प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत अशी चौकशी पूर्ण करील :

परंतु, कोणत्याही प्रकरणामध्ये चौकशीचा असा कालावधी तीन महिन्यांपेक्षा जास्त वाढविता येणार नाही आणि चौकशीच्या कार्यवाहीस अपरिहार्य कारणांमुळे विलंब झाल्यास चौकशीच्या अशा वाढीव कालावधीबाबत जिल्हाधिकारी राज्य शासनाची पूर्व संमती घेईल.

(३) जिल्हाधिकारी, अशा चौकशीचे निष्कर्ष, त्यासाठी लागू असलेल्या कलम ५५अ अन्वये उचित कारवाई करण्यासाठी शासनाला सादर करील.".

**३४१ ब-६** व **३४१ ब-७** ** ** **

**३४१ क.** ते **३४१ स.** ** ** **

**३४३.** ते **३५१.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५. ]**

**[ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगर विकास).**]**

**[ विधानसभेने दिनांक १ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.